जळगाव जिल्ह्यात १ ते २१ जून, २०१८ दरम्यान झालेल्या वादळी वारा व अवेळी पाऊस यामुळे केळी व इतर पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीएलएस-२०१८/प्र.क्र.२०२/म-०३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०४ जून,२०१९

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-सीएलएस-५९८३/२४८३६१/प्र.क्र.८२०/म-३, दिनांक ३१ जानेवारी, १९८३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक १३ मे, २०१५.
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-सीएलएस-२०१८/प्र.क्र.२०२/म-३, दिनांक १० ऑक्टोबर, २०१८.
४) जिल्हाधिकारी, जळगाव यांचे पत्र क्रमांक-म.शा.टंचाई-३/ई-टपाल/२०१९/३५३, दिनांक २ मार्च, २०१९.
५) कृषि संचालक,कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र.सांख्यिक/शा.प./पि.वि.यो./तक्रार/१८७/१९,दि.२२ मे,२०१९.

<u>प्रस्तावना:-</u>

जळगांव जिल्ह्यात दिनांक १ ते २१ जून, २०१८ या कालावधीत वादळी वारा व अवेळी पावसामुळे केळी व इतर फळपिकांचे नुकसान झाले आहे. सदर झालेल्या फळपिकांच्या नुकसानीबाबत आपदग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यासंदर्भात दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ उप समितीची बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार जिल्हाधिकारी, जळगाव यांना बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी आवश्यक असलेल्या रकमेची परिगणना करुन शासनाने निधी मागणी करण्याबाबतचे आदेश संदर्भ क्रमांक ३ नुसार दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगाव यांनी संदर्भ क्र. ४ च्या पत्रान्वये निधी मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. तसेच संदर्भ क्र. ५ नुसार कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनीही निधीची परिगणना करुन शासनास कळविले आहे. त्यानुसार या घटनेतील बाधितांना निधी मंजूर करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

दिनांक १ ते २१ जून, २०१८ या कालावधीत जळगांव जिल्हयात वादळी वारा व अवेळी पावसामुळे केळी व इतर फळपिकांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झालेल्या बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून जिल्हाधिकारी, जळगाव यांना रुपये १५,८२,५३,५१०/- (अक्षरी रुपये पंधरा कोटी ब्याऐंशी लक्ष त्रेपन्न हजार पाचशे दहा फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त घटनेत बाधित झालेल्या आपदग्रस्तांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मदत देण्यात यावी:-

अ) प्रचलित पध्दतीनुसार कृषि सहायक, तलाठी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त स्वाक्षरीने पूर्ण करण्यात आलेल्या पंचनाम्याबाबत शासनास सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार मदतीचे वाटप जिल्हाधिकारी, जळगाव यांनी करावी. फळपिकांचे नुकसान ३३ टक्क्यांपेक्षा अधिक असणे आवश्यक राहील.

ब) फळपिकांच्या झालेल्या नुकसानीकरीता मदतीची रक्कम खातेदारांच्या बँक खत्यावर थेट जमा करतांना मदतीच्या रकमेमधून कोणत्याही बँकेने कोणत्याही प्रकारची वसूली करु नये.

क) संबंधित बाधितांच्या बँक बचत खात्यात मदतीची रक्कम थेट जमा करण्यात यावी. कोणत्याही बाधितास रोखीन किंवा निविष्ठा स्वरुपात मदत देण्यात येवू नये.

ड) जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता होते यांची खातरजमा करुन सदर शासन निर्णयातील धोरणाप्रमाणे संबंधितांना मदतीचे वाटप करावे.

३. या प्रयोजनासाठी होणारा खर्च "मागणी क्र.सी-६, २२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०२, पूर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य, (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२) (१२) पीक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना सहाय्य, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ २३०९) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पुनर्विनियोजनेव्दारे उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०४१२०४३२३४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.06.04 12:08:42 +05'30'

(सु. ह. उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
२. जिल्हाधिकारी, जळगाव.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई/नागपूर
५. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगाव.
७. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन,
८. अवर सचिव / कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-०९/अर्थसंकल्प-६), मंत्रालय, मुंबई-३२.
९. अवरसचिव / कार्यासन अधिकारी, कृषि विभाग (१०-अे / १३-अे), मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अधिकारी (कार्यासन ब-१, म-११), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती (कार्यासन म-०३), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.